RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १०, अंक ३१] शुक्रवार, जुलै २६, २०२४/श्रावण ४, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

### नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१, दिनांक ८ जुलै २०२४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक मलोसेहअ-२०१५/कलम-३/अधिसूचना/टीपीव्ही-७.—ज्याअर्थी, राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधले आहे.) दिनांक २८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदीनुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने उक्त अधिनियम लागू झाल्यापासून ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन नगरविकास विभागाने निर्णय क्र.टीपीएस-१८१५/प्र.क्र.१८८/१५/नवि-१३, दिनांक १८ डिसेंबर २०१८ अन्वये, (यापुढे “उक्त शासन निर्णय” असे संबोधले आहे.) नगरविकास विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील कार्यालयांमार्फत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांची यादी प्रसिद्ध केली असून, या सेवा संबंधित कार्यालयांनी उक्त अधिनियमातील कलम ३ अन्वये अधिसूचित करण्याबाबत सूचित केले आहे :

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, उक्त शासन निर्णयाप्रमाणे, नगररचना संचालनायातंर्गत कार्यरत असणाऱ्या नगररचना विभागाच्या कार्यालयांमार्फत (यापुढे “उक्त कार्यालये” असे संबोधले आहे.) देण्यात येणाऱ्या सेवा पुरविण्यास सक्षम पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी, खालील “अनुसूची-अ” मध्ये विहित केल्यानुसार, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत अधिसूचित करण्यात येत आहेत.

## अनुसूची-अ

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात येत असलेल्या सेवांचा तपशील.)

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>लोकसेवांची सूची</th><th>आवश्यक कागदपत्रे</th><th>शुल्क</th><th>नियत कालमर्यादा</th><th>पदनिर्देशित अधिकारी</th><th>प्रथम अपिलीय अधिकारी</th><th>द्वितीय अपिलीय अधिकारी</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">प्रादेशिक योजनेतील झोन दाखला देणे.</td><td rowspan="2">(१) विहित नमुन्यातील अर्ज<br>(२) ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा.</td><td rowspan="2">शासनाने निश्चित केल्यानुसार</td><td rowspan="2">७ दिवस</td><td colspan="3">सहायक संचालक, नगररचना ह्या दर्जाचे अधिकारी “कार्यालय प्रमुख” असलेली शाखा कार्यालये.</td></tr>
<tr><td>रचना सहायक/ सहायक नगररचनाकार</td><td>नगररचनाकार</td><td>सहायक संचालक, नगररचना</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">प्रादेशिक योजनेतील भाग नकाशा देणे.</td><td rowspan="2">(१) विहित नमुन्यातील अर्ज<br>(२) ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा.<br>(३) मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे नकाशा.</td><td rowspan="2">शासनाने निश्चित केल्यानुसार</td><td rowspan="2">३ दिवस</td><td colspan="3">सहायक संचालक, नगररचना ह्या दर्जाचे अधिकारी “कार्यालय प्रमुख” असलेली शाखा कार्यालये.</td></tr>
<tr><td>रचना सहायक/ सहायक नगररचनाकार</td><td>नगर रचनाकार</td><td>सहायक संचालक, नगररचना</td></tr>
</table>

- प्रस्तुतची अधिसूचना उक्त सर्व कार्यालयांच्या सूचना फलकावर तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावी.
- प्रस्तुतची अधिसूचना संचालनालयाचे अधिकृत संकेतस्थळ *www.dtp.maharashtra.gov.in* वर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक,
नगररचना, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.